Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC
KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by
NBA
NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 13/09/2025**

# Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाटणा, आतल्या वाटणा...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

## दिनविशेष

### किराणा घराण्याच्या गायिका डॉ. प्रभा अत्रे



डॉ. प्रभा अत्रे या किराणा घराण्याच्या गायिका होत्या. त्यांचा जन्म १३ सप्टेंबर १९३२ रोजी पुण्यात झाला. डॉ. प्रभा अत्रे यांनी भारतीय शास्त्रीय संगीत जागतिक स्तरावर लोकप्रिय करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. विजय करंदीकर, सुरेशबाबू माने, हिराबाई बडोदेकर यांच्याकडून त्यांनी शास्त्रीय संगीताचे धडे घेतले. त्यांनी संगीतामध्ये डॉक्टरेट मिळवली होती. प्रभा अत्रे यांनी गांधर्व महाविद्यालयाच्या 'संगीत अलंकार' आणि 'संगीत प्रवीण' या पदव्या प्राप्त केल्या होत्या. तसेच ट्रीनीटी कॉलेज ऑफ लंडन येथून त्यांनी वेस्टर्न म्युझिक थिअरी या विषयातही अभ्यास पूर्ण केला. ख्याल, तराणा, चतुरंग, टप्पा, ठुमरी, दादरा, भजन, गीत, गझल अशा वेगवेगळ्या संगीत प्रकारांत त्यांनी रचना केल्या आहेत.

'संगीत शारदा', 'विद्याहरण', 'संशयकल्लोळ', 'मृच्छकटिक' इ. नाटकांमधून त्यांना नावाजलेल्या नटांबरोबर काम करण्याची संधी मिळाली. आकाशवाणीत सहाय्यक संगीत निर्माता म्हणून त्यांनी १९६० ते १९७० पर्यंत काम केले. त्यानंतर त्यांनी १९७९ ते १९९२ पर्यंत मुंबईच्या श्री.ना.दा.ठा. महिला विद्यापीठात संगीत विभाग प्रमुख म्हणूनही काम केले. गाण्याबरोबरच त्यांनी नृत्याचंही प्रशिक्षण घेतलं होतं. डॉ. अत्रे यांनी संगीत या विषयावर ११ पुस्तके लिहिली आहेत. सामाजिक आणि सांस्कृतिक बांधिलकी जपण्यासाठी त्यांनी डॉ. प्रभा अत्रे फाऊंडेशनची स्थापना केली होती. तसेच शास्त्रीय संगीताच्या अध्यापनासाठी त्यांनी स्वरमयी गुरुकुल या संस्थेची स्थापना केली होती. त्यांना १९९० साली पद्मश्री तर २००२ साली पद्मभूषण या नागरी पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. तसेच संगीत नाटक अकादमीचे पुरस्कार मिळाले आहेत. अशा या ख्यातनाम शास्त्रीय गायिकेचे १३ जानेवारी २०२४ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Sep 13, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC
KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401